# अवतीभवती

## सोशल नेटवर्किंगला महत्त्वाचे स्थान

पुणे, ता. २७ : सध्या अनेक बड्या कंपन्या कर्मचारी भरतीसाठी सोशल नेटवर्किंग साइट आणि 'ऑनलाइन रिव्ह्यू'चा अधिकाधिक वापर करताना दिसतात. तसेच कंपन्यांच्या खरेदीच्या निर्णयप्रक्रियेत सोशल नेटवर्किंग साईटला महत्त्वाचे स्थान आहे," असे मत मोबाईल व सोशल नेटवर्किंग माध्यम तज्ज्ञ, एक्सटेन्शिया इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे कार्यकारी संचालक व माध्यमतज्ज्ञ उम्मीद कोठावाला यांनी व्यक्त केले. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कन्सल्टन्स ऑफ इंडिया, पुणे विभाग आणि एमआयटी स्कूल ऑफ टेलिकॉम मॅनेजमेंट यांच्यातर्फे आयोजित व्याख्यानात 'सोशल मीडियाचा व्यवसाय क्षेत्रातील वाढता प्रभाव' या विषयावर ते बोलत होते. व्यवस्थापन विषयावरील सुमारे शंभर पदवीधरांना सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाची माहिती त्यांनी दिली.